**नियमीत दिवाणी दावा क्र.२५५/२००४ मधील निशाणी क्र.२११ वरील आदेश**

( CNR : MHAH2500 0476 2004 )

वादींनी सदरचा अर्ज दावा दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केलेला आहे. वादीने निशाणी क्र.२१२ वर सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने असे कथन केले आहे की, वादींनी सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी दावा मिळकत गट नं.१४ चे पोटहिस्से झालेले नव्हते. परंतु दावा चालू असताना प्रतिवादी क्र.१ व २ यांनी हेतुपुरस्सर गट नं.१४ चे पोटहिस्से वादींचे संमती न घेता केलेले आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता गट नं.१४ ची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादींना दावा कलम १ मध्ये गट नं.१४ क्षेत्र २हे. ०६आर. ऐवजी गट नं.१४/१, १४/२, १४/३/१, १४/३/१, १४/३/२, १४/३/३, १४/३/४, १४/३/५ असे नमुद करावयाचे आहे व त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये गट नं.१४ चे झालेले पोटहिस्से हे वादींवर बंधनकारक नाहीत व त्यास लिज पेन्डसचा बाध येतो असा जाहीर ठराव करण्याची मागणी दाव्यामध्ये करण्याची विनंती वादींनी केली आहे. वादी पुढे असे कथन करतात की, सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे. तसेच सदर दुरुस्ती ही न्यायाचे व हकीगतीचे दृष्टीने जरुरीची आहे व त्याामुळे प्रतिवादीस कोणतीही हार्डशीप होत नसल्याने सदर अर्ज मंजुर व्हावा.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा नाही. दाव्यामध्ये वादीचा जबाब झालेला आहे व साक्षीदाराचाही जबाब झालेला आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत आहे. अर्जास कोणतेही संयुक्तिक कारण घडलेले नाही. तसेच दुरुस्तीबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन जास्तीत जास्त खर्चाचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

४. वादीचे व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करता येईल. सदर आदेशामध्ये असे नमूद आहे की, '*दाव्यामध्ये पक्षकारांना त्यांच्या प्लीडींगमध्ये*

*कधीही दुरुस्ती करता येईल, जर ती दुरुस्ती दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण होण्यासाठी आवश्यक असेल.'* त्याच आदेशामध्ये '*दाव्याचा पुरावा चालू झाल्यानंतर दुरुस्ती करता येणार नाही*' असे नमूद केलेले आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लक्षात घेता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये वादीचा पुरावा झालेला आहे. दावा प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबीत आहे. सदरचा दावा हा वाटप व निरंतर ताकीद मनाईसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादींनी मागितलेली दुरुस्ती ही दावा दावा दाखल केल्यानंतर घडलेल्या घटनांवर अवलंबून आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दावा मिळकतीच्या पोटहिश्याशी निगडीत असून त्यामुळे दावा मिळकतीच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही.

७. वादींचे व प्रतिवादीची कथने विचारात घेता वादीने मागितलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची जरी नसली तरी दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केल्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्यामध्ये स्पष्टता येऊन दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी.

**( एस. सी. साळवी )**

**दि.२१.१२.२०२३**
**पारनेर**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**